
स्थापना : १०/९/१९३५ ☎ : (०२१३२) २६३३१७

# ग्रामपंचायत कार्यालय - वडगाव आनंद



ता. जुन्नर, जि. पुणे - ४१२ ४११.

जावक क्रमांक : ०५/२०१८-१९ दिनांक ०५/०४/२०१८

प्रति,

मा.सौ.रीतुजी छाब्रियाजी,

मे.मुकुल माधव फाउंडेशन, पुणे.

यांस सविनय सादर.......

विषय :- मौजे पादिरवाडी गावाच्या गावतळे जलपूजन व लोकार्पण सोहळा कार्यक्रमास आपण उपस्थित राहिल्याबद्दल मनापासून आभार.....

संदर्भ :- दिनांक ०१/०४/२०१८ चा कार्यक्रम.

आदरणीय महोदया,

आपल्या फिनोलेक्स कंपनीचे सी.एस.आर.पार्टनर मे.मुकुल माधव फाउंडेशनच्या विशेष सहकार्याने आमच्या गावातील मौजे पादिरवाडी गावातील गावतळे जलपुनर्भरण करण्याचे काम खऱ्या अर्थाने आपल्या माध्यमातून करण्यात आले, आपल्या मुकुल माधव फाउंडेशन व फिनोलेक्स परिवाराचे मनापासून आभार मानतो, धन्यवाद देतो.

आदरणीय अध्यक्षा मा.सौ.रीतुजी छाब्रिया मॅडम, आदरणीय जिल्हाधिकारी मा.श्री.सौरभ राव साहेब (भा.प्र.से.), फिनोलेक्स कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट मा.श्री.बी.आर.मेहता साहेब, आपले मुख्य स्वीय सहाय्यक मा.श्री.सचिन कुलकर्णी साहेब, तसेच फिनोलेक्स कंपनीचे मार्केटिंग मॅनेजर मा.श्री.साकोरे साहेब या सर्वासमवेत आपण आमच्या गावात आलात, आणि खऱ्या अर्थाने आम्हा सर्वांमध्ये जणू काय एक संजीवनी आल्यासारखे वाटले, आपल्या येण्याने व आपल्या दातृत्वाने खऱ्या अर्थाने आमच्या गावाला संजीवनी मिळून गाव अमृतमय झाले आहे.

आपण केलेल्या सहकार्यामुळे आमचा भाग सुजलाम् सुफलाम झाला आहे, आपण केलेल्या सहकार्याचे ऋण आम्ही कधीच फेडू शकत नाही, आपल्या सारख्या दातृत्ववान मायबापांची कृपेची सावली आमच्या गावावर असू द्यावी, हि पुन्हा एकदा विनम्रतेची हाक. पुन्हा एकदा आपल्या गाव भेटीच्या प्रतीक्षेत ....

कळावे,

आपला विश्वासू,

सरपंच

ग्रा.पं.वडगाव आनंद

ता.जुन्नर,जि.पुणे